**पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण**
आकुर्डी, पुणे-४४, दुरध्वनी क्र.०२०-२७१६६०००, फॅक्स : ०२०-२७३५३६७०

जा.क्र.विप्रा/प्रशासन/२५४७ दि. १८/८/२०१८

**जाहीर निवेदन**

पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण आकुर्डी, पुणे या कार्यालयात करार पध्दतीने सेवानिवृत्त अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यासाठी प्रशासकीय, लेखा, अभियांत्रिकी व नगररचना विभागातून सेवानिवृत्त झालेल्या अधिकाऱ्याकडून दि. २०/८/२०१८ ते ७/९/२०१८ या कालावधीत अर्ज मागविण्यात येत आहेत. पदांची अर्हता, मुलाखतीचा दिनांक, अटी व शर्ती, अर्जाचा नमुना याकरिता www.pcntda.org.in या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आलेली जाहिरात पहावी.

सही / --
मुख्य कार्यकारी अधिकारी

# पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण

आकुर्डी, पुणे-४४, दुरध्वनी क्र.०२०-२७६५२९३४ / २७६५२९३५, फॅक्स : ०२०-२७३५३६७०


जा.क्र.विप्रा/प्रशासन/२५४७ दि. १८/८/२०१८

## जाहिरात

पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण कार्यालयात करार पध्दतीने सेवानिवृत्त अधिकाऱ्याची नेमणूक करावयाची आहे.त्याकरिता सेवानिवृत्त अधिकाऱ्यांची संवर्गनिहाय नामिकासूची तयार करण्याकरिता पात्र सेवानिवृत्त अधिकाऱ्याकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

करार पध्दतीने भरावयाच्या पदांची अर्हता, पदाच्या कामाचे स्वरूप यांची माहिती खालीलप्रमाणे.

**तक्ता -अ**

| अ. क्र. | संवर्ग | अर्हता | पदाच्या कामाचे स्वरूप |
|---|---|---|---|
| १ | प्रशासकीय/ लेखा | शासकीय, निमशासकीय अथवा स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सेवेतून वर्ग १ अथवा वर्ग २ वरील पदावरून सेवानिवृत्त झालेले अधिकारी | भूखंड, सदनिका, दुकाने यांचे भाडेपट्टे विषयक हस्तांतरण विषयक कामकाज तसेच सोपविण्यात येणारे इतर कामकाज. |
| २ | स्थापत्य अभियांत्रिकी | शासकीय निमशासकीय अथवा स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सेवेतून उप अभियंता अथवा शाखा अभियंता पदावरून सेवानिवृत्त झालेले अधिकारी | प्राधिकरणातील विकास कामाबाबत निविदा तयार करणे, प्रसिध्द करणे, निविदांची छाननी करणे, इ. कामकाज अतिक्रमण प्रतिबंध व अतिक्रमण निर्मूलनविषयक कामकाज. तसेच सोपविण्यात येणारे इतर कामकाज. |
| ३ | नगर रचना (नियोजन) | शासकीय निमशासकीय अथवा स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सेवेतून नगररचनाकार अथवा सहायक नगररचनाकार पदावरून सेवानिवृत्त झालेले अधिकारी | बांधकाम परवानगी विषयक कामे, विकास योजनांशी, रेखांकनाशी संबंधित कामे. तसेच सोपविण्यात येणारे इतर कामकाज. |

**अ) सर्वसाधारण सूचना**

१. उपरोक्त पदासाठी सोबत जोडलेल्या नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत. अर्ज सादर करण्याचा कालावधी दि.२०/८/२०१८ पासून ७/९/२०१८ रोजी सायंकाळी ५.४५ पर्यंत आहे.
२. मुदतीत अर्ज करण्याऱ्या अधिकाऱ्यांची दि. १२/९/२०१८ रोजी सकाळी ११.०० वाजता ७ वा मजला पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण येथे मुलाखत घेण्यात येईल.
३. मुलाखतीस उपस्थित रहाण्याबाबत उमेदवारांना स्वतंत्ररित्या कळविण्यात येणार नाही.
४. मुलाखतीस उपस्थित न राहिल्यास निवडीसाठी विचार केला जाणार नाही.
५. उमेदवारांच्या मुलाखती घेऊन नामिकासूची तयार केली जाईल व त्यानुसार उमेदवारांना नियुक्ती आदेश देण्यात येतील.
६. सदर नामिकासूची ची वैधता ३ वर्षे राहील.
७. करार पध्दतीने नियुक्ती देताना १ वर्षासाठी नियुक्ती देण्यात येईल.कामकाज व आवश्यकता विचारात घेऊन दरवर्षी नियुक्तीचे नूतनीकरण करण्यात येईल.
८. सदर अधिकाऱ्यांचे पारिश्रमिक व वेतन सामान्य प्रशासन विभागाकडील दिनांक १७/१२/२०१६ च्या शासन निर्णयातील ड (१) येथील तरतुदीनुसार निश्चित करण्यात येईल.
९. निवड झालेल्या उमेदवारांना विहित केलेल्या नमुन्यात रुपये १००/- च्या स्टॅम्पपेपरवर हमीपत्र द्यावे लागेल.
१०. अपूर्ण अर्ज, स्वाक्षरी, फोटो नसलेले अर्ज अपात्र करण्यात येतील.

**ब) अर्ज करण्याची पध्दत:-**

उमेदवाराने सोबतच्या अर्जाच्या नमुन्यात स्वत:चे संपूर्ण नांव ( आडनांव प्रथम), जन्मदिनांक, वय, लिंग, स्त्री / पुरुष, पत्रव्यवहाराचा पत्ता (पिनकोडसहीत) व मोबाईल क्रमांक, ज्या कार्यालयातून सेवानिवृत्त झाले त्या कार्यालयाचे नांव, सेवानिवृत्तीचा दिनांक, शासकीय सेवेत असताना मिळालेले अंतिम वेतन व पदनाम तसेच सध्या मिळणारे निवृत्ती वेतन याबाबतचा तपशिल नमुद करुन मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, आकुर्डी, पुणे-४४ यांचे नावे अर्ज दि.७/९/२०१८ रोजी कार्यालयीन वेळेपर्यंत पोहोचेल अशा रितीने पोस्टाने पाठवावा अथवा कार्यालयात समक्ष सादर करावा. या अर्जाचा नमुना प्राधिकरण वेबसाईट : **www.pcntda.org.in** वर उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

अर्जावर पासपोर्ट आकाराचा फोटो सांक्षाकित करुन चिकटवावा.

**अर्जासोबत खालील प्रमाणपत्रे सांक्षाकित करुन जोडावीत.**

१. शासकीय संस्थेकडील सेवानिवृत्तीचा आदेश
२. शैक्षणिक अर्हता धारण व इतर परिक्षा उत्तीर्ण असल्याबाबतच्या छायांकित प्रती.

**मुलाखत:-**

अर्ज सादर करणाऱ्या अधिकाऱ्यांनी दि.१२/९/२०१८ रोजी मुलाखतीस हजर रहावे.
मुलाखतीचे ठिकाण: ७ व मजला पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, आकुर्डी, पुणे.
मुलाखतीची वेळ: सकाळी ११.०० वाजता
मुलाखतीचे वेळी कागदपत्रांच्या मूळ प्रती सोबत आणाव्यात. मुलाखतीसाठी प्रवास खर्च दिला जाणार नाही.

**क) सर्वसाधारण अटी व शर्ती**

१. सेवानिवृत्त अधिकारी वयाच्या ६५ व्या वर्षापर्यंतच कार्यरत राहू शकतील त्यामुळे ६५ वर्षापेक्षा कमी वय असलेल्या अधिकाऱ्यांनीच अर्ज सादर करावेत.
२. तक्ता अ येथे नमुद करण्यात आलेले पदाचे कामकाज करण्यास अधिकारी सक्षम असणे आवश्यक आहे.

३. अधिकाऱ्याविरूध्द विभागीय चौकशीची कारवाई चालू किंवा प्रस्तावित नसावी, अथवा चौकशी प्रकरणी शिक्षा झालेली नसावी.
४. अधिकारी शारीरिक मानसिक व आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा.
५. नियुक्त करावयाची अधिकारी व्यक्ती इतर व्यावसायिक कामात गुंतलेली नसावी.
६. सोपविलेली कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पूर्ण करणे आवश्यक राहील. त्यांच्या कामकाजाबाबत सक्षम प्राधिकारी वेळोवेळी आढावा घेऊन कामाचे मूल्यमापन करतील.
७. नियुक्त केलेल्या व्यक्तीकडून नियमित सेवेत घेण्याची अथवा इतर कोणत्याही हक्काची मागणी करता येणार नाही.

**पदांची संख्या निवड प्रक्रियेबाबत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांना असेल, व याबाबत कोणताही आक्षेप विचारात घेतला जाणार नाही.**

जाहिरात क्रमांक : १ /२०१८
दिनांक : १६/८/२०१८

**सही / --**
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**पिंपरी चिंचवड नवनगर विकास**
**प्राधिकरण, आकुर्डी, पुणे- ४११ ०४४**

अर्जदाराचा स्वसाक्षांकित फोटो

प्रति,

मा. मुख्य कार्यकारी अधिकारी
पिं.चिं. नवनगर विकास प्राधिकरण,
आकुर्डी, पुणे

**विषय:-** करार पध्दतीने सेवानिवृत्त अधिकाऱ्याची नियुक्ती करण्याबाबत.

**संदर्भ:-** आपली जाहिरात क्र. ---------------------------- दिनांक ---------------------

महोदय,

मी आपल्या कार्यालयात करार पध्दतीने (प्रशासकीय/लेखा, स्थापत्य अभियांत्रिकी अथवा नगर नियोजन ) या संवर्गात करार पध्दतीने काम करू इच्छितो/इच्छिते.

१) पूर्ण नाव (प्रथम आडनाव) :-

२) पत्रव्यवहाराचा पूर्ण पत्ता :-

३) कोणत्या संवर्गासाठी अर्ज करू इच्छितात प्रशासकीय/लेखा, स्थापत्य अभियांत्रिकी अथवा नगरनियोजन :-

४) जन्मदिनांक :-

५) वय :-

६) स्त्री/पुरुष :-

७) कोणत्या पदावरुन सेवानिवृत्त झाले :-

८) कोणत्या कार्यालयातून सेवानिवृत्त झाले :-

९) सेवानिवृत्तीचा दिनांक :-

१०) सेवानिवृत्तीच्या वेळेचे अंतिम वेतन :-

११) सध्या मिळणारे निवृत्ती वेतन :-

१२) अर्जदाराविरुध्द विभागीय चौकशीची कारवाई चालू आहे काय? :-

१३) अर्जदारास चौकशी अंती शिक्षा झाली आहे काय? :-

१४) अर्जदाराची शैक्षणिक अर्हता :-

१५) अर्जदाराने त्यांच्या सेवाकालावधीत केलेल्या :-

सेवेचा तपशील

| पासून | पर्यंत | पदनाम | नियुक्तीचे ठिकाण |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |

वरील माहितीच्या पुराव्यादाखल मी खालील साक्षांकित कागदपत्रे सोबत सादर करीत आहे. मूळ कागदपत्रे मुलाखतीच्या वेळी सादर करीन.

१) शैक्षणिक अर्हतेबाबतची प्रमाणपत्रे
२) सेवानिवृत्तीचा आदेश

मी प्रतिज्ञापूर्वक नमूद करतो की, वरील सर्व माहिती सत्य आहे. ही माहिती चुकीची आढळून आल्यास होणाऱ्या कारवाईस मी जबाबदार राहीन,याची मला जाणीव आहे.

**अर्जदाराची स्वाक्षरी**